**<u>अधिकार अभिलेख</u>**

**संगणकीकृत गाव नमुना नं. ७/१२ च्या उताऱ्यावरील डिजीटल स्वाक्षरीबाबत क्षेत्रिय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना स्पष्टीकरणात्मक दिशानिर्देश देण्याबाबत.....**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३०३ /ज-१ अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०८ ऑगस्ट, २०१९

**<u>वाचा</u> :-**

१. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.
२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१.
३. महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल अधिकाऱ्यांची कार्यपध्दती) नियम,१९६७.
४. महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका खंड ४ (भाग-२)

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका ( खंड-४) भाग -दोन महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसूली लेखांकन पध्दती, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ यामधील तरतुदींनुसार राज्याच्या ग्रामीण क्षेत्रात ग्राम पातळीवर महसूली लेखे ठेवण्याकरिता विविध गाव नमुने व दुय्यम नोंदवहया विहित करण्यात आलेल्या आहेत. यामधील गाव नमुना नं ७ हा ***<u>"अधिकार अभिलेख"</u>*** विषयक असून गाव नमुना नं.१२ हा **"पिकांची नोंदवही"**ठेवण्यासंदर्भात आहे. उक्त नमूद नियमपुस्तिकेतील, ***<u>"गा.न.नं ७/१२ संबंधी खुलासा (अधिकार अभिलेख आणि पिकांची नोंदवही)"</u>*** या शीर्षाखाली प्रकरणांमध्ये या एकत्रित नमुन्यावरील सर्वसाधारण सूचना तसेच पीक नोंदवहीमधील नोंदी घेण्या संदर्भातील कार्यपध्दती नमूद केलेली आहे. उक्त नमूद नियमांमधील तरतुदीनुसार सद्या सर्व ***<u>गा.न.नं ७/१२ चा उतारा हा संबंधित गावच्या तलाठी यांच्या स्वाक्षरीने देण्यात येतो.</u>***

तथापि, नागरीकांना "**आपले सरकार**" या संकेतस्थळावरून वितरीत करण्यात येणाऱ्या संगणकीकृत गा.न.नं.७/१२ च्या उताऱ्यामध्ये सुसुत्रता राहण्याच्या दृष्टीने तसेच तांत्रिक अडचणी येवू नयेत याद्दष्टीने असे उतारे तालुक्यातील एका अधिकाऱ्याकडून संगणकीकृत स्वाक्षरीत करून निर्गमित करणे गरजेचे आहे. यास्तव त्यानुषंगाने क्षेत्रिय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना स्पष्टीकरणात्मक दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



Scanned with OKEN Scanner

उपरोक्त पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड-४) भाग -दोन महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसूली लेखांकन पध्दती, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ यामधील तरतुदींनुसार प्राप्त अधिकारात क्षेत्रिय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना या आदेशाव्दारे पुढील प्रमाणे स्पष्टीकरणात्मक दिशानिर्देश देण्यात येत आहेत :-

(१) “**आपले सरकार”** या संकेतस्थळावरून वितरीत करण्यात येणारा संगणकीकृत गा.न.नं.७/१२ चा उतारा हा यापुढे संबंधीत तालुक्यातील नायब तहसिलदार (महसूल) यांच्या संगणकीकृत स्वाक्षरीने निर्गमित करण्यात यावा.

(२) तसेच, “महाभूमी” च्या संकेतस्थळावरून वितरीत करण्यात येणारा संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चा उतारा हा पुर्वीप्रमाणेच संबंधीत गावच्या तलाठी यांच्या संगणकीकृत स्वाक्षरीने निर्गमित करण्यात यावा.

(३) तहसिल कार्यालयातील “फेरफार कक्षा” मधून वितरीत होणाऱ्या संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चा उतारा संबंधीत तालुक्याच्या नायब तहसिलदार (महसूल) यांच्या हस्तलिखीत स्वाक्षरीने निर्गमीत करण्यात यावा.

(४) सर्व संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चे उतारे डिजीटल स्वाक्षरीत होईपर्यंत ही तात्पुरती व्यवस्था आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०८०८१७५८५४६६१९ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( रमेश चव्हाण )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

७) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१०) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
१२) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१४) विभागीय आयुक्त, कोकण विभाग
१५) जिल्हाधिकारी, मुं बई उपनगर.
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७) निवासी लेखाधिकारी, मुंबई.
१८) उपसचिव (ज-१अ), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) निवड नस्ती (कार्यासन ज-१अ).

******



Scanned with OKEN Scanner